क्र. पोअय/वाचक/नवीन तीन कायदे /२०२५/1196
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 24 APR 2025

# परिपत्रक

संदर्भ :- पोमसं/२३/५४/नवीन तीन कायदे/८५/२०२५ दि.१७.०४.२२०२२५

विषय :- **(BNSS कलम १८७(५) च्या दुसऱ्या अटीबाबत)**
भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) अंतर्गत अटक करण्यात आलेल्या व्यक्तींच्या कोठडी संदर्भातील मार्गदर्शक सूचना

--oo--

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, भारतीय संसदेमार्फत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अधिनियमित करण्यात आली असून ती १ जुलै २०२४ पासून अंमलात आलेली आहे. (या अधिनियमास पुढे BNSS असे संबोधण्यात येईल) ;

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम ३५ मध्ये अशा परिस्थितींची यादी देण्यात आलेली आहे. ज्या अंतर्गत कोणत्याही पोलीस अधिकारी अटक वॉरंटशिवाय व्यक्तीस अटक करू शकतो;

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम १८७ मध्ये अशा प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे की, जेव्हा तपास २४ तासांच्या आत पूर्ण होऊ शकत नाही;

आणि ज्या अन्वये, कलम १८७ च्या पोट कलम (५) मधील दुसरी अट असे स्पष्ट करते की, पोलीस कोठडी आदेशित झालेल्या व्यक्तीस केवळ पोलीस ठाण्यातच ठेवण्यात यावे.

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम ५३, अटक केलेल्या व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणीस अनिवार्य करते;

आणि ज्या अन्वये BNSS मधील कलम ५७, अटकेतील व्यक्तीस कार्यक्षेत्र असलेल्या दंडाधिकाऱ्यास किंवा संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यासमोर हजर करण्याचे नियमन करते;

२. त्यामुळे, आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) मधील वरील तरतुदींचे सुसंगत पालन सुनिश्चित करण्याच्या दृष्टिने, पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जात आहेत, जेणेकरून कुणाही व्यक्तीला कायद्याचे विरूध्द ताब्यात ठेवले जाणार नाही;

(i) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस त्याच पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवण्यात यावे जिथे FIR नोंदविण्यात आलेली आहे.

(ii) जर काही कारणास्तव अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस त्या पोलीस ठाण्यात ठेवता येत नसेल, तर अशा व्यक्तीस इतर कोणत्याही पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवता येईल.

(iii) संबंधीत पोलीस अधिकारी अटक केलेल्या व्यक्तीस तपासासाठी, न्यायालयात हजर करण्यासाठी, काढू शकतो. तपास पूर्ण झाल्यानंतर किंवा त्या दिवशी अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक नसेल, तर त्यास पुन्हा वरीलप्रामाणे पोलीस स्टेशनचे कोठडीत ठेवण्यात यावे. या उद्देशासाठी ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस कोठडीतून बाहेर नेण्यात आलेल्या वेळेची तसेच पुन्हा कोठडीत परत आणण्यात आलेल्या वेळेची नोंद करण्यात यावी.

तरी जिल्हयातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी हे त्यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अवगत करतील व परिपत्रकात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून घेतील.

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे उक्त परिपत्रकातील सर्व तरतुदी बाबत अधिनस्त प्रभारी अधिकारी तसेच दुय्यम अधिकारी/ अंमलदार यांना मार्गदर्शक सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून घेतील.

सहपत्र- इंग्रजी व मराठी परिपत्रक (पाने- २)

Kumar

**( कुमार चिंता)**
पोलीस अधीक्षक , यवतमाळ

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ जिल्हा,सर्व ठाणेदार यवतमाळ जिल्हा, सर्व शाखा प्रभारी अधिकारी.पो.अ.कार्यालय यवतमाळ.पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष, यवतमाळ.पोलीस उपअधिक्षक (मुख्या),यवतमाळ,रा.पो.नि.पो.मु. यवतमाळ.तसेच सर्व प्रभारी अधिकारी शाखा,यवतमाळ.याना परिपत्रकाचे अनुषंगाने उचीत कार्यवाहीकरीता

प्रत - अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
प्रत सविनंय सादर - मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती.परिक्षेत्र,अमरावती.

1201

19 APR 2025
S.P. ..........
Addl. S.P. ..........
Dy. S.P.H.Q. ..........
O.S. ..........
H.C. ..........
Branch S.P. Reader

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/२३/५४/नवीन तीन कायदे/८५/२०२४ मुंबई, दि.१७ /०४/२०२५

## परिपत्रक

### (BNSS कलम १८७ (५) च्या दुसऱ्या अटीबाबत)

**विषय :-** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) अंतर्गत अटक करण्यात आलेल्या व्यक्तींच्या कोठडी संदर्भातील मार्गदर्शक सूचना

*****

ज्या अन्वये, भारतीय संसदेमार्फत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अधिनियमित करण्यात आली असून ती १ जुलै २०२४ पासून अंमलात आलेली आहे (या अधिनियमास पुढे BNSS असे संबोधण्यात येईल) ;

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम ३५ मध्ये अशा परिस्थितींची यादी देण्यात आलेली आहे ज्या अंतर्गत कोणताही पोलीस अधिकारी अटक वॉरंटशिवाय व्यक्तीस अटक करू शकतो;

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम १८७ मध्ये अशी प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे की, जेव्हा तपास २४ तासांच्या आत पूर्ण होऊ शकत नाही;

आणि ज्या अन्वये, कलम १८७ च्या पोट-कलम (५) मधील दुसरी अट असे स्पष्ट करते की, पोलीस कोठडी आदेशित झालेल्या व्यक्तीस केवळ पोलीस ठाण्यातच ठेवण्यात यावे.

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम ५३, अटक केलेल्या व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणीस अनिवार्य करते;

आणि ज्या अन्वये, BNSS मधील कलम ५७, अटकेतील व्यक्तीस कार्यक्षेत्र असलेल्या दंडाधिकाऱ्यास किंवा संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यासमोर हजर करण्याचे नियमन करते;

२. त्यामुळे, आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) मधील वरील तरतुदींचे सुसंगत पालन सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जात आहेत, जेणेकरुन कुणाही व्यक्तीला कायद्याचे विरुध्द ताब्यात ठेवले जाणार नाही ;

(i) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस त्याच पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवण्यात यावे जिथे FIR नोंदविण्यात आलेली आहे.

(ii) जर काही कारणास्तव अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस त्या पोलीस ठाण्यात ठेवता येत नसेल, तर अशा व्यक्तीस इतर कोणत्याही पोलीस ठाण्याच्या कोठडीत ठेवता येईल.

(iii) संबंधित पोलीस अधिकारी अटक केलेल्या व्यक्तीस तपासासाठी, न्यायालयात हजर करण्यासाठी, वैद्यकीय तपासणीसाठी किंवा इतर कोणत्याही कायदेशीर कारणास्तव पोलीस ठाण्याच्या कोठडीतून बाहेर काढू शकतो. तपास पूर्ण झाल्यानंतर किंवा त्या दिवशी अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक नसेल, तर त्यास पुन्हा वरीलप्रमाणे पोलीस स्टेशनचे कोठडीत ठेवण्यात यावे. या उद्देशासाठी ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस कोठडीतून बाहेर नेण्यात आलेल्या वेळेची तसेच पुन्हा कोठडीत परत आणण्यात आलेल्या वेळेची नोंद करण्यात यावी.

३. आपल्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना वरील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

( रश्मि शुक्ला )
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य
अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे शाखा, महाराष्ट्र राज्य
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)